# मशरूम (आळिंबी) लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण

कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी नांदेड -१ येथे माविम (महिला आर्थिक विकास महामंडळ) यांच्या संयुक्त विद्यमाने व डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी यांच्या मार्गदर्शनाने पिक संरक्षण तज्ञ प्रा.माणिक कल्याणकर यांनी आयोजित केलेले मशरूम(आळंबी) उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमिता क्षत्रिय ( कृषि विस्तार तज्ञ) कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य मार्गदर्शन प्रा.माणिक कल्याणकर ( पिक संरक्षण तज्ञ) कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी यांनी कमी भांडवल, कमी जागा व पुरेशा संसाधनाचा वापर करून महिलांना मातीविरहित शेती पूरक व्यवसाय म्हणून मशरूम उत्पादन हा एक उत्पन्नाचा चांगला पर्याय असून आपल्या भागात मशरूम लागवड चांगल्या पद्धतीने करता येते आणि मशरूम ची लागवड करताना घ्यावयाची काळजी, लागवड करण्याची पद्दत, बि निवड, हार्वेस्टिंग पद्धत, खाण्यायोग्य सुरक्षित मशरूम ची उत्पादन करणे या बाबत प्रात्यक्षिकांसह उपस्थित प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले.

प्रा. सौ.अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ ) यांनी मशरूम आहारात समावेश केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढवते,त्वचा आणि केसांसाठी चांगले असते, पचन सुधारते, व्हिटॅमिन डीचा वनस्पती-आधारित स्रोत, मधुमेह नियंत्रित करण्यास मदत: मशरूम रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकते. वजन कमी करण्यास मदत करते अश्या प्रकारे मशरूमचे आहारातील व आरोग्यातील महत्व यावर उपस्थित प्रशिक्षणार्थीना माहिती दिली. यावेळी पशुवैद्यक तज्ञ डॉ. महेश अंबोरे यांनीही प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री अशोक भालेराव, श्री राजीव इंगोले, सौ प्राजक्ता हाडोळीकर, श्री शिवाजी जाधव, श्री शंकर कोणापुरे, श्री राहुल राऊत इत्यादींनी सहकार्य केले.

कार्यक्रम करता महिला आर्थिक विकास महामंडळ चे नांदेड चे व्यवस्थापक श्री राहूल शिंदे यांनी समन्वय व व्यवस्थापण केले.

या प्रसंगी प्रभावती लोकेवार, शशिकला जाधव, रमा वैद्य, संभाजी मैठे, कल्याण गुब्रे निळा नाळेश्वर भागतील बचत गटातील ४५ महिला व शेतकरी उपस्थित होते.














जेएनआईएसटीआर ट्रस्ट नांदेड संचलित व
आयसीएआर, नवी दिल्ली संलग्नीत
कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी, नांदेड
मशरुम (आळिंबी) उत्पादन तंत्रज्ञान
प्रशिक्षण/Training on
Mushroom Cultivation Technology
Krishi Vigyan Kendra,Pokharni, Nanded